**श्री. दादासाहेब रघुनाथ गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे (मूळ संवर्ग उपजिल्हाधिकारी, गट-अ) यांच्या सेवा महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक : बदली-२३२४/प्र.क्र.१८/ना.पु.१५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०२४.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र नागरी सेवा वेतन (नियम), १९८१, नियम ५६.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र.एस आरव्ही-२०१८/प्र.क्र.२०८/कार्या.१२, दि.०५.०९.२०१८.
३) शासन अधिसूचना, अ.ना.पु. व ग्रा.सं.वि., क्र. सेपनि-१२२०/प्र.क्र.१४०/ना.पु.१५, दि.२७.०३.२०२३.
४) भारत निवडणूक आयोग, अधिसूचना, दि.२४.०१.२०२४.
५) शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. महसूल व वन विभाग, क्र.टीआरएफ-०४२३/ प्र.क्र.९७/ ई-२, दि.११.०४.२०२३.
६) शासन आदेश, समक्रमांक, दि.०८.०१.२०२४.
७) शासन पत्र, समक्रमांक ,दि.०९.०१.२०२४.

**प्रस्तावना :**

१. संदर्भ क्र. ५ येथील शासन आदेश, महसूल व वन विभाग, दि.११.०४.२०२३ अन्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व सा.प्र.वि., अधिसूचना, महसूल विभाग वाटप नियम, दि.१४.०७.२०२१ मधील नियम ८ मधील तरतुदींनुसार, श्री. दादासाहेब रघुनाथ गिते, उपजिल्हाधिकारी (तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग) यांची महसूल व वन विभागामार्फत, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे या रिक्त पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे. सदर आदेशान्वये श्री. गिते हे दि.१३.०४.२०२३ पासून अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे या पदावर कार्यरत आहेत.

**२. जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ पदाचे सेवाप्रवेश नियम : शासन अधिसूचना, दि.२७.०३.२०२३:**

सदर अधिसुचनेन्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ संवर्गातील पद पदोन्नतीने, उपनियंत्रक, शिधावाटप यांच्या बदलीने किंवा मंजूर पदाच्या १५ % च्या मर्यादेत प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद आहे.

३. संदर्भ क्र. ६ येथील शासन आदेश, दि.०८.०१.२०२४ अन्वये प्रशासकीय कारणास्तव श्री. दादासाहेब रघुनाथ गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे (मूळ संवर्ग-उपजिल्हाधिकारी) यांच्या सेवा मूळ महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित करण्यात आल्या आहेत.

४. संदर्भ क्र. ७ येथील शासन पत्र, दि.०९.०१.२०२४ अन्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या कारणास्तव लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत शासन आदेश, दि.०८.०१.२०२४ च्या अंमलबजावणीस तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती.

५. आता, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने, शासन आदेश, दि.०८.०१.२०२४ अनुसार श्री. दादासाहेब गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या सेवा त्यांच्या मूळ महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**-: शासन आदेश :-**

१. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने श्री. दादासाहेब रघुनाथ गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या कारणास्तव सुरु ठेवलेल्या सेवा महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित करण्यात येत आहे.

२. श्री. दादासाहेब रघुनाथ गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या सेवा महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित केल्यानंतर रिक्त होणाऱ्या अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा पुढील आदेश होईपर्यंत श्री. प्रशांत मोहन खताळ, सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

३. **श्री. प्रशांत मोहन खताळ, सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे** यांनी अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे या पदाचा **अतिरिक्त कार्यभार** तात्काळ धारण करावा.

४. सदर शासन आदेश तात्काळ अंमलात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०६२५१५०५४१७५०६ असा आहे. सदर शासन आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE

Digitally signed by RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=cf4fd1e4249e6612552db1552e149b0688899cac7ecc37ca9fbf60ec7d9103d6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5B10EBD8BEE2E77F1E579C83AA5378F02AE01B1765CCDD10F83CB76CD8BBE016, cn=RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE
Date: 2024.06.25 15:28:09 +05'30'

**( रामचंद्र धनावडे )**
**सह सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (महसूल), मंत्रालय, मुंबई.
३) श्री. दादासाहेब गिते, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे.
४) श्री. प्रशांत खताळ, सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे.
(अ.क्र.३ व ४ यांना उप आयुक्त (पुरवठा), पुणे विभाग यांच्यामार्फत).

**प्रत :-**

१) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
४) जिल्हाधिकारी, पुणे.
५) उप आयुक्त (पुरवठा), पुणे विभाग, पुणे.
६) महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१ /२, मुंबई /नागपूर.
७) सह सचिव/उप सचिव, कार्यासन ई-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती, ना.पु.१५.